लोकसत्ता पा.नं.१५

# वसई, भाईंदरमध्ये ३६ हत्या

## २०२२ मधील सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

**वसई :** २०२२ हे वर्ष वसई आणि भाईंदरमधील अनेक खळबळजनक हत्यांनी गाजले. शहरात २०२२ या वर्षात ३६ हत्यांचे गुन्हे दाखल झाले आहेत. २०२१ च्या तुलनेच हत्यांच्या प्रकरणात घट झाली असून, या सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

वसई आणि भाईंदर शहरात २०२१ मध्ये ४२ हत्यांचे गुन्हे नोंदविण्यात आले होते. तर, २०२२ मध्ये त्यात सहाने घट झाली असून, ३६ हत्यांची नोंद झाली. त्यात वसईतील लॉजमध्ये दोन वेगवेगळ्या घटनेत प्रियकराकडून प्रेयसीची हत्या, काशिमीरा येथे चिमुकल्याचे अपहरण करून हत्या, विरारमधील व्यापाऱ्याची हत्या आदी गाजलेल्या हत्यांचा समावेश आहे. वसईत राहणाऱ्या श्रद्धा वालकरची दिल्लीत हत्या, अंधेरीतील शाळकरी विद्यार्थिनीची हत्या करून नायगाव येथे फेकून दिलेल्या मृतदेहाचे प्रकरणही गाजले होते.

२०२० ते २०२२ या तीन वर्षांत वसई, विरार आणि मीरा-भाईंदर शहरात एकूण ९६ हत्या झाल्या होत्या. २०२२ मधील सर्वच्या सर्व ३६ हत्यांच्या गुन्ह्यांची उकल करण्यात यश आलेले असले तरी मागील दोन वर्षांतील पाच हत्यांची उकल अद्याप झालेली नाही. त्या गुन्ह्यांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### २०२२ या वर्षातील प्रमुख हत्या

**४ फेब्रुवारी २०२२**
भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा येथे सावत्र पित्याने दोन वर्षांच्या चिमुकलीची हत्या केली. आदील खान असे या आरोपीचे नाव आहे. मुलगी सतत रडत असल्याने त्याने ही हत्या केली होती.

**१ मार्च २०२२**
वसईच्या पापडी येथील स्टेट्स लॉजमध्ये सायली शाहसने (२६) हिची तिचा प्रियकर सागर नाईक (२८) याने गळा दाबून हत्या केली. त्यानंतर बिहार येथील एका हॉटेलमध्ये जाऊन त्याने गळफास घेऊन स्वतःला संपवले.

**१४ एप्रिल २०२२**
नालासोपारा पश्चिमेच्या कळंब लॉजमध्ये अभिषेक शहा याने त्याच्या अल्पवयीन मुलीची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर चर्चगेट-विरार लोकलखाली उडी मारून आत्महत्या केली होती.


**३० मे २०२२**
वसईच्या 'एव्हरशाइन' येथे राहणाऱ्या ब्रायन राको आणि त्याची पत्नी पूनम ब्राको यांनी मीरा रोड येथील एका हॉटेलमध्ये सात वर्षांच्या मुलीची हत्या करून आत्महत्येचा प्रयत्न केला. कर्जबाजारी झाल्याने त्यांनी हे पाऊल उचलले. या घटनेत दाम्पत्य बचावले असून, त्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

**२८ जून २०२२**
खेळण्याच्या वादात मोबाइल तुटल्याने झालेल्या वादात संजय शर्मा (२४) या तरुणाला जीव गमवावा लागला. याप्रकरणी वालीव पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांसह तिघांना अटक केली. वसई पूर्वेच्या कामण येथे ही घटना घडली.

**३१ जुलै २०२२**
काशिमिरा येथे राहणाऱ्या मयांक ठाकूर या मुलाची त्याच्या दोन मित्रांनी ३५ लाख रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून हत्या केली. याप्रकरणी काशिमिरा पोलिसांनी अफजल अन्सारी (२२) आणि इम्रान शेख (२२) यांना अटक केली. या दोघांनी मयांकला फिरायला नेण्याच्या बहाण्याने बोलावले आणि त्याला वसईत नेऊन हत्या केली.

**३ सप्टेंबर २०२२**
विरारच्या नारिंगी येथील व्यापारी धर्मेंद्र वाघेला यांची आर्थिक वादातून हत्या करण्यात आली. पोलिसांनी जयेश पांचाळ या त्याच्या मित्राला अटक केली. वाघेला यांची हत्या केल्यानंतर त्यांचा मृतदेह एका लाकडी कपाटात टाकून ते कपाट एका टेम्पोतून नेऊन विरारच्या 'ग्लोबल सिटी' येथील नाल्यात फेकले होते.

**१८ नोव्हेंबर २०२२**
नालासोपारा पूर्वेच्या संतोष भुवन येथे राहणाऱ्या राजेश विश्वकर्मा (३२) याने त्याची पत्नी संजू सरोज हिची हत्या केली. तो उत्तर प्रदेश येथे पळून जात असताना पोलिसांनी रेल्वेत अटक केली.



**तीन वर्षांतील हत्येचे गुन्हे**

| वर्ष | २०२० | २०२१ | २०२२ |
|---|---|---|---|
| हत्या | २० | ४२ | ३६ |
| गुन्ह्यांची उकल | १९ | ३८ | ३६ |

लोकसत्ता पा.नं.१७.

# आयुक्तालयातील दोन पोलिसांचा सन्मान

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरार पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक सुभाष गोईलकर यांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपती पदक, तर नवघरचे साहाय्यक पोलीस आयुक्त शशिकांत भोसले यांना अंतरिक्ष सुरक्षा अभियानामध्ये सलग दोन वर्षे सेवा बजावल्याबद्दल पोलीस महासंचालकांचे पदक प्रदान करण्यात आले आहे.

गोईलकर यांना २०१७ मध्ये पोलीस महासंचालकांचे पदक मिळाले होते. त्यानंतर त्यांना आता राष्ट्रपतीपदक मिळाले आहे. प्रजासत्ताकदिनी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. राजभवनात होणाऱ्या सोहळ्यात राज्यपालांच्या हस्ते गोईलकर यांना राष्ट्रपतीपदक प्रदान केले जाणार आहे, तर नवघर विभागाचे साहाय्यक पोलीस आयुक्त भोसले यांना पोलीस आयुक्त पांडेय यांच्या हस्ते महासंचालकांचे पदक प्रदान करण्यात आले आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ.५ ता.१.

# मीरा रोडमधील ब्रँड फॅक्टरीला भीषण आग

## तिघांचा जीव वाचवण्यात अग्निशमन दलाला यश

**मीरा रोड :** मीरा रोड येथील ब्रँड फॅक्टरीच्या इमारतीला गुरुवारी शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. ही आग मोठ्या स्वरूपात असल्यामुळे अग्निशमन दलाला आग आटोक्यात आणण्यासाठी जवळपास चार तास लागले. या आगीतून तीन कर्मचाऱ्यांचा जीव वाचवण्यात अग्निशमन दलाला यश आले. सुदैवाने कोणत्याही स्वरूपाची जीवितहानी झाली नाही.



मीरा रोड येथील हाटकेश परिसरात असलेल्या ब्रँड फॅक्टरीच्या सहाव्या मजल्याला भीषण आग लागली होती. आग मोठ्या स्वरूपात लागल्यामुळे काही क्षणातच ही आग सातव्या मजल्यावर पोहोचली. अग्निशमन दलाला माहिती मिळताच तत्काळ अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. ही आग विझवण्यासाठी १ टीटीएल वाहन, २ वॉटर टँकर, ७ मिनी वॉटर टेंडर, २ बजर अशी १२ वाहने आणि ५७ जवान, ४ अधिकारी, १ मुख्य अधिकारी या सर्वांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न करत चार तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या वेळी आगीमध्ये सातव्या मजल्यावर अडकलेल्या तीन व्यक्तींना बचावकार्य राबवून त्यांचा जीव वाचवला. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. या आगीमध्ये ब्रँड फॅक्टरीमधील विविध साहित्य जळून खाक झाले. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याची माहिती अग्निशमन विभागप्रमुख प्रकाश बोराडे यांनी दिली आहे.

# तुळींज पोलिसांकडून सराईत गुन्हेगारांना अटक



**नालासोपारा :** वसई-विरारसह मीरा-भाईंदरमध्ये धुमाकूळ घालणारे आणि दोन वर्षांपासून फरार असलेल्या सराईत चोरट्यांना पकडण्यात तुळींज पोलिसांना यश आले असून, १०० टक्के मुद्देमाल मिळवण्यात आला आहे. नालासोपाऱ्याच्या तुळींज पोलीस ठाण्यात १६ जानेवारीला चोरीचा गुन्हा दाखल झाला. ज्यामध्ये सोने, टीव्ही रोख आणि मोबाईलदेखील होता. तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने सराईत घरफोडी करणाऱ्या दोन चोरट्यांना अटक केली. देवेंद्र शेट्टी व शेखर नटराज नायर अशी या सराईत आरोपींची नावे असून, त्यांच्याकडून घरफोडीच्या गुन्ह्यात चोरलेले ११ तोळे सोन्याचे दागिने, २० तोळे चांदीचे दागिने, कलर टीव्ही व मोबाईल डीव्हाईस असा एकूण ५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. चोरी करण्यात हे आरोपी इतके सराईत आहेत की, त्यांनी एकामागोमाग चोरीचा सपाटा लावला होता. घरात माणसे झोपेत असतानादेखील सराईत पद्धतीने हे चोरी करायचे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या आरोपींवर मीरा-भाईंदर व मुंबई परिसरात अनेक चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

CamScanner

पुढारी ५·५८·१.

# गावच्या सुरक्षेसाठी इच्छुकांची सुरक्षा रक्षक म्हणून नेमणूक

## प्रजासत्ताक दिनी ग्रामसुरक्षा दलाची स्थापना : ३२ गावांत १०० सुरक्षा रक्षक



**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

आपली सुरक्षा आपल्याच हाती या अभियानांतर्गत मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयअंतर्गत येणाऱ्या मांडवी पोलिसांनी एक अनोखा प्रयोग राबविला असून पोलीस ठाण्यामार्फत प्रजासत्ताक दिनी ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक गावातून नियुक्त करण्यात आलेले हे रक्षक आपापल्या गाव परिसरातील घटनांवर लक्ष ठेवून आपले गाव सुरक्षित कसे राहील याची काळजी घेऊन पोलिसांना साहाय्य करणार आहेत. मांडवी पोलीस स्टेशन हद्दीत सुरक्षा अधिक गतिमान व्हावी, यासाठी मांडवी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील ३२ गावात १०० सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.

प्रजासत्ताक दिनी स्थापन करण्यात आलेल्या या सुरक्षा रक्षकांना मांडवी वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रफुल्ल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली नेमण्यात आलेल्या १०० सुरक्षा रक्षकांना सूचना व सुरक्षा रक्षकांनी काय करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मांडवी पोलीस व गावांतील पोलीस पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रांम सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली आहे. हे सुरक्षा रक्षक दल सहाय्यक पोलीस निरीक्षक/बाबासो पाटील. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस अंमलदार सुदेश कोरे, प्रशांत मोहळक, संभाजी लोंढे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणार आहे. चोरी, घरफोडी, व इतर घटनांसाठी तत्पर पोलीस सेवा मिळावी यासाठी तयार करण्यात आलेल्या मांडवी पोलीस स्टेशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत असून ग्रामस्थांनी मांडवी पोलीस स्टेशनचे कौतुक केले आहे.

> मीरा-भायंदर पोलीस आयुक्तालयातील मांडवी पोलीस ठाण्याचे क्षेत्र हे मोठे असून बराचसा भाग हा दुर्गम आहे. यात पोलीस ठाण्याचे कर्मचारी संख्याबळ कमी असल्याने खेड्यापाड्यात पोलीस लगेच पोहचु शकत नाहीत. म्हणूनच गावा-गावातील त्या क्षेत्राचे सुरक्षा रक्षक तयार करण्यात आले आहेत. या सुरक्षा रक्षकांना पोलीस काठी, शिटी, टीशर्ट व ओळखपत्र देण्यात आले आहे. ही संकल्पना चंद्रगुप्त मौर्य, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ग्राम सुरक्षा रक्षक तैनातीवर आधारित असून लवकरच पोलिसांच्या खास प्रशिक्षणार्थ्यांकडून रक्षकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे.
>
> **-प्रफुल वाघ,** पोलीस निरीक्षक, मांडवी पोलीस ठाणे.

CS CamScanner

लोकमत ५-५१-३०

# सायबर गुन्ह्यांच्या २,७३८ तक्रारी, ९२ लाखांची रक्कम केली परत

## मीरा- भाईंदर : फसवणुकीच्या तक्रारींत चारपट झाली वाढ


**धीरज परब**

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा- भाईंदर- वसई- विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील नागरिकांना विविध प्रकारे लुटणाऱ्या सायबर लुटारूंचा उच्छाद गेल्या वर्षात तब्बल चारपटीने वाढला आहे. २०२१ मध्ये सायबर फसवणुकीच्या ७९४ तक्रारी आल्या होत्या, तर २०२२ सालात तक्रारींची संख्या तब्बल दोन हजार ७३८ इतकी झाली. पोलिसांच्या सायबर शाखेने सायबर लुटारूंनी लुटलेल्यांपैकी २०२१ मध्ये २८ लाख ८१ हजार इतकी रक्कम, तर २०२२ सालात ९१ लाख ९५ हजार इतकी रक्कम नागरिकांना परत मिळवून दिली.

डेबिट वा क्रेडिट कार्डचा ओटीपी अनोळखी व्यक्तीला शेअर करणे, ऑनलाइन खरेदी- विक्री व्यवहारात क्यूआर कोडद्वारे फसवणूक करणे, मोठ्या रकमेची लॉटरी, व्हाउचर वा भेटवस्तूचे प्रलोभन, ऑनलाइन नोकरी, क्रिप्टो करन्सीतून दुप्पट नफ्याच्या प्रलोभनाने फसवणूक केली जात आहे.

लोन ॲप वा लिंक, गुगलवर खोटा कस्टमर केअर क्रमांक देऊन वा वीजबिल भरले नाही सांगून सायबर लुटारू लोकांना लुटत असतात. लोन ॲपमध्ये तर नागरिकांची छायाचित्रे व्हिडीओ मॉर्फ करून त्यांना बदनामी करण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे कोणतीही लिंक क्लिक करण्यापूर्वी नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



### २७ प्रकरणे उघड

गेल्या वर्षी २७ प्रकरणांत आरोपींना शोधून स्थानिक पोलिसांच्या ताब्यात दिले. सायबर तक्रारींचा तपास करून लोकांना न्यायालयीन प्रक्रियेविना पैसे परत मिळाले.

### ऑनलाइन फसवणूक झाल्यास कोठे तक्रार कराल?

ऑनलाइन फसवणूक झाल्यास १९३० हा हेल्पलाइन क्रमांक तसेच www.cybercrime.gov.in या वेबसाइटवर तक्रार करता येते. तर संशयास्पद एसएमएस, ईमेल, कॉल आल्यास www.reportphishing.in वर तक्रार करा. फसवणूक होताच गोल्डन अवरमध्ये सायबर पोलिसांशी संपर्क साधल्यास गेलेले पैसे थांबवता येतात.

### सायबर पोलिसांची उत्तम कामगिरी

१ इन्स्टाग्रामवर मेक मनी होम ऑनलाइन अशी जाहिरात करून लिंक पाठवून फसवणूक करणाऱ्या एका खासगी बँकेच्या कर्मचाऱ्यासह तिघांना सायबर शाखेने अटक केली. त्यात अपूर्ण कागदपत्रे असूनही बनावट कंपनीच्या नावे बँक खाते उघडले होते.

२ नामांकित विमा कंपन्यांच्या ग्राहकांचा डाटा मिळवून त्यांना पॉलिसी नूतनीकरणासाठी संपर्क साधून बनावट पॉलिसी बनवून दिली. या प्रकरणात सायबर शाखेने पाच जणांना अटक केली.

> सायबर गुन्ह्यात फसवणूक झालेल्या तक्रारींच्या एकूण रकमेची आकडेवारी देशभरातील सायबर सिस्टीममध्येच नाही. फसवणूक झालेल्यांनी सोशल मीडियावरील रिपोर्ट सुविधेचा वापर करून तत्काळ तक्रार द्यावी. तसेच, पोलिसांचे संकेतस्थळ व सहायता क्रमांकावरही तक्रार करता येते.
>
> **- सुजितकुमार गुंजकर, पोलिस निरीक्षक, सायबर शाखा**

### आयटी तज्ज्ञ, डॉक्टरांनाही गंडा

फसगत झालेल्यांत आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ, वकील, डॉक्टर, व्यावसायिक, उच्चशिक्षित यांचाही समावेश आहे.

# फर्निचरच्या कामाचे आमिष दाखवून फसवणारा अटकेत

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत एका व्यक्तीने फर्निचर बनवण्याचे काम देतो, असे सांगून एका व्यक्तीची ३१ हजार ३०० रुपयांची फसवणूक केली होती. या फसवणूक करणाऱ्या आरोपीस नवघर पोलिसांनी अटक केली आहे.

अर्जुन रामलखन विश्वकर्मा यांना २१ जानेवारी रोजी अरविंद गुप्ता याने मोबाईलवरून संपर्क करून मिरारोड येथील हॉटेलच्या फर्निचरचे काम देतो असे सांगितले. त्यानुसार विश्वकर्मा हे अरविंद गुप्ता यांना भेटले असता त्याने त्यांची ओळख संतोष पांडे याच्याशी करून दिली. त्यावेळी हॉटेलमध्ये १५० बेडचे व कपाटांचे काम असल्याचे सांगून त्यांच्याकडून ॲग्रीमेंट करावे लागेल, असे कारण सांगून प्रथम ११ हजार ३०० रु. घेतले तसेच काम मिळवण्यासाठी ५०,००० रु. खर्च येईल, असे सांगून त्याच्याकडून दुसऱ्या वेळेस २०,००० रु. संतोष पांडे याने घेऊन त्यांना फर्निचर बनवण्याचे काम न देता व त्यांनी दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली.

त्यामुळे विश्वकर्मा यांनी २४ जानेवारी रोजी नवघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार या गुन्ह्यांचा तपास करत आरोपी संतोषकुमार ऊर्फ पन्नालाल बुधीराम पांडे यास खैरपाडा , वसई येथून अटक करुन त्याच्याकडून गुन्ह्यातील २०,००० रुपये इतकी रोख रक्कम हस्तगत केली आहे. पुढील तपास नवघर पोलीस करत आहेत.

← पुढारी ५·५१·२०

CamScanner

सामना पा.नं. ६१.

## बेकारीचे भयानक वास्तव

# पोलीस भरतीसाठी बी.टेक, बीई, एमबीए, एम.कॉम उमेदवार

## भाईंदरमध्ये शिपाई, चालक पदाकरिता हजारो उच्चशिक्षितांची झुंबड

भाईंदर, दि. २७ (सा.वा.) - बी.टेक, एमबीए, बीबीए, बी.फार्म, बी.कॉम, एम.कॉम, एमएससी, बीएससी, एलएलबी आदी उच्चशिक्षित तरुणांनी कोण्या एका बहुराष्ट्रीय कंपनीतील नोकरीसाठी हे अर्ज केले नसून पोलीस शिपाई व चालक पदाकरिता त्यांनी भाईंदरमध्ये गर्दी केली आहे. मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय शहर आणि ग्रामीण येथील अवघ्या ९९६ पदांसाठी होणाऱ्या भरती प्रक्रियेकरिता तब्बल ७३ हजार २२१ अर्ज आले आहेत. यातील २७ हजार १३२ अर्ज हे उच्चशिक्षित तरुणांनी दाखल केले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील बेकारीचे भयानक वास्तव या पोलीस भरती प्रक्रियेतून पुन्हा एकदा समोर आले आहे.



पोलीस भरती प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद, अचूक व पारदर्शक होणार असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे वेळ आणि श्रम कमी होणार आहे. भरतीसाठी कोणीही पैशांची मागणी करत असेल तर उमेदवारांनी तातडीने त्याची माहिती पोलिसांना द्यावा.

▮ प्रकाश गायकवाड,
उपायुक्त, मुख्यालय, मीरा-भाईंदर, वसई-विरार

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील शिपाई व चालक पदांसाठी थेट भरती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. याठिकाणी परीक्षार्थींची संख्या जास्त असल्यामुळे शहरातील निवड केलेल्या सुभाष चंद्र बोस मैदानाचा वापर करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या पोलीस भरतीसाठी उच्च शिक्षित पदवीधारकांसह २७ हजार १३२ तरुणांनी पोलीस भरतीसाठी अर्ज केले आहेत. दरम्यान एकूण ७३ हजार २२१ अर्जांपैकी ६० हजार ९८९ मुलांचे तर १२ हजार २३२ मुलींचे पोलीस शिपाई पदासाठी आले आहेत. यासोबतच १० वाहनचालक पोलीस पदाकरिता तर १ हजार १९६ मुलांचे आणि ४१ मुलींचे असे एकूण १ हजार २३७ अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

### डिग्रीची ऐसीतैशी

बी.टेक. (१४१), एम.ई (४), बी.ई (३७१), एम.बी.ए (४५), बी.बी.ए (८१), बी.फार्म (५०), बी.कॉम (४४७३), एम कॉम (५२९), एम.एस.सी (२७९), बी.एस.सी (३९५२), एल.एल.बी (१०), एम.ए (१७३७), बी.ए (१४,८४३), बी.बी.एम (२४), बी.सी.ए (२६८), बी.एड (८), बी.एम.एस (६४), बी.पी.एड (२०), एम.पी.एड (३), बी.सी.एस (१५८), बी.एस. डब्ल्यू (३१), एम.एस.डब्ल्यू (४१) या उच्चशिक्षित पदवीधारकांनी पोलीस भरतीसाठी अर्ज दाखल केले आहेत.

CS CamScanner

सामना पा.नं.६

## भाईंदरमध्ये वेगाचे दोन बळी

### गोल्डन नेस्ट परिसरात भीषण अपघात

भाईंदर, दि. २७ (सा.वा.) - दुचाकीस्वाराचे नियंत्रण सुटल्याने दोघे कॅसलमिल नाका येथील मॉँसाहेब सौ. मीनाताई ठाकरे फ्लायओव्हरवरून खाली कोसळून त्यांच्या मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी भाईंदरच्या गोल्डन नेस्ट परिसरात वेगाने दोघांचा बळी घेतल्याचे समोर आले आहे. अली मणिहार (२२) आणि तुफेल शाह (२५) अशी मृतांची नावे आहेत.

मॅक्सेस चित्रपटगृहातून चित्रपट बघून अली मणिहार आणि तुफेल शाह हे दोघे दुचाकीवरून रात्री साडेबाराच्या सुमारास गोल्डन नेस्ट परिसरातून घरी जात होते. यावेळी ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच नवघर पोलिसांना घटनास्थळी धाव घेऊन ट्रकचालक उस्मान जाज याला बेड्या ठोकल्या. दरम्यान हा अपघात नेमका कशामुळे झाला याचे कारण समजू शकले नसून याचा अधिक तपास नवघर पोलीस करीत आहेत.

लोकसत्ता पा.नं.१५.

## वसईत १८०० मूर्तींचे विसर्जन

**वसई :** वसई-विरार शहरात माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. शहरातील विविध ठिकाणी गुरुवारी अठराशेहून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन शांततेत पार पडले.

भाद्रपद महिन्यातील गणेशोत्सवाप्रमाणे माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा केला जाऊ लागला आहे. शहरातील अनेक भाविकांच्या घरी दीड दिवसाच्या गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. निरोप देण्यासाठी ढोल- ताशाच्या गजरात, बँडच्या तालावर मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. जय घोष करत व ढोल ताशा, मृदुंगाच्या गजराने सारी वसई विरार नगरी दुमदुमली होती. तर, दुसरीकडे गाव, तलाव, समुद्रकिनारी विसर्जनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. शहरात एक हजार ८८४ मूर्तींचे विसर्जन झाल्याची माहिती पालिकेने दिली आहे.

म.टा.५.पा.१.

# क्रेडिट कार्ड फसवणुकीचे दीड लाख रुपये परत

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

### सायबर गुन्हे शाखेची कामगिरी

भाईंदरमध्ये क्रेडिट कार्डवरील रिवॉर्ड पॉईंटच्या नावाखाली फसवणूक झालेल्या एका व्यक्तीचे दीड लाख रुपये सायबर गुन्हे शाखेने परत केले आहेत. सुनील सिंग नामक व्यक्तीने याबाबत तक्रार केल्यानंतर, पोलिसांकडून ही कार्यवाही करण्यात आली आहे.



भाईंदर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या सुनील सिंग यांना एका अज्ञात व्यक्तीने फोन केला आणि रिवॉर्ड पॉईंट अपडेट करण्याच्या नावाखाली त्यांच्या क्रेडिट कार्डसंबंधीची माहिती घेतली होती. नंतर, त्यांच्या खात्यातून एक लाख ६७ हजार रुपये काढून घेण्यात आले होते. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच, सिंग यांनी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या सायबर शाखेकडे तक्रार केली होती.

त्यानुसार प्राप्त माहितीआधारे पोलिस तपास करत असताना, सिंग यांच्या खात्यातून वेगवेगळ्या खात्यांमध्ये पैसे वर्ग करण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी संबंधित कंपनीशी पत्रव्यवहार केल्यानंतर, सिंग यांच्या खात्यात पुन्हा एक लाख ४० हजार रुपये परत मिळवून देण्यात आले आहेत. या, अशाप्रकारे फसवणूक टाळण्यासाठी योग्य खबरदारी घेण्याचे, तसेच कोणत्याही नागरिकांची फसवणूक झाल्यात सायबर शाखेची संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

लोकसत्ता पा. नं १५.



# मुंबई-अहमदाबाद महामार्गावर इंधनाचा काळाबाजार तेजीत

## तेल, डिझेल, मद्य, डांबराची छुपी खरेदी-विक्री; घटनास्थळी पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**पालघर:** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेल्या एका धाब्यावर इंधनाच्या काळ्याबाजाराचा प्रकार उघडकीस आला आहे. हा महामार्ग अशा प्रकारांमुळे पुन्हा एकदा प्रकाश झोतात आला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन एकाला ताब्यात घेतले आहे.

अलीकडे महामार्ग परिसरात मोठ्या प्रमाणात धाबे तयार होत असून या धाब्यावर रात्रीच्या वेळी काळे धंदे राजरोसपणे सुरू आहेत, असे सांगितले जाते. धाब्यांवर तेल, डिझेल, इंधन, डांबर, अमली पदार्थ, मद्य, चोरीचे भंगार विक्री असे प्रकार फोफावत आहेत. हे काळे धंदे करणाऱ्याच्या अनेक टोळ्या महामार्गावर सक्रिय असून अनेक वेळा पोलिसांनी त्यांच्यावर कारवाया केलेल्या आहेत. त्यानंतरही हे प्रकार रात्रीच्या वेळी तेजीत सुरू आहेत.

मनोर महामार्गाच्या नांदगाव हद्दीमध्ये मुंबई वाहिनीच्या एका धाब्यावर बायोडिझेल एका टँकरमधून काढून लहान टेम्पोमध्ये असलेल्या टाकीत बेकायदारीत्या काढले जात होते. हे डिझेल काढताना चक्क यंत्र सामग्रीचा वापर करण्यात आला होता. हा प्रकार एका टोळीद्वारे करण्यात येत होता. काहींना हा प्रकार कळताच याबाबत जाब विचारला असता ही टोळी तेथून फरार झाली.

मनोर पोलिसांना ही माहिती लागताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत हा बेकायदा अवैध धंदे करणाऱ्या एकाला तात्काळ ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ५५ लीटर डिझेल व काही साहित्य पोलिसांनी हस्तगत केले आहे. पुढील तपास व चौकशी सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी याविरोधी मोहीम उघडली होती. परंतु ती थंडावल्यानंतर पुन्हा हे प्रकार फोफावले आहेत, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

### ढाब्यांवर गैरप्रकार?

बेकायदा भंगार, लोखंडी सळ्या, प्रतिबंध असलेली मद्य, गुटखा, अमली पदार्थ आदींची जोरदार खरेदी-विक्री सातीवली, हालोली, दुर्वेस, टेन, मस्तान नाका, नांदगाव, आवढानी, चिल्हार आणि वाडा खडकोणा गाव हद्दीतील धाब्यांवर सुरू असल्याचे सांगण्यात येते. रात्रीच्या वेळी काही चालक पार्किंग, जेवणाच्या किवा आराम करण्याच्या बहाण्याने धाब्यांवर वाहन थांबून हा अवैध व्यवसाय करत असतात. अशा प्रकारे इंधन, जैवइंधनाची तर काही प्रमाणात रसायनांची चोरी करून त्याची काळाबाजारात विक्री केली जाते.

CamScanner

मराठी दैनिक
# चौफेर संघर्ष
हेच जीवन

शनिवार २८ जानेवारी २०२३ । अंक : ६२ वर्ष : ०८ । पाने : ०८ । किंमत १ रुपया E-mail : chaufersanghrsh15@gmail.com • kailas0007@gmail.com RNI No.: MAHMAR/2015/66631

पालघर जिल्ह्यातून प्रकाशित होणारे धडाडीचे मराठी दैनिक • संपादक : कैलास राजाराम रांगणेकर : 9890202907 /8999939927




# मांडवी पोलीस स्टेशनमार्फत प्रजासत्ताक दिनी ग्रामसुरक्षा दलाची स्थापना

## ३२ गावांत १०० सुरक्षा रक्षकांची नेमणूक, गावे होणार अधिक सुरक्षित



**विरार/विशेष प्रतिनिधी :** मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयअंतर्गत येणाऱ्या मांडवी पोलीस स्टेशनमार्फत प्रजासत्ताक दिनी ग्रामसुरक्षा दल्याची स्थापना करण्यात आली आहे. मांडवी पोलीस स्टेशनला एक वर्षे पूर्ण होत असताना पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात गावातील सुरक्षा अधिक गतिमान व्हावी यासाठी मांडवी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील ३२ गावात १०० सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत, मांडवी पोलीस स्टेशनचे क्षेत्र मोठे आहे, पोलीस संख्याबळ कमी असल्याने खेड्यापाड्यात पोलीस लगेच पोहचु शकत नाहीत, म्हणूनच गावा- गावातील सुरक्षा रक्षक तयार करण्यात आले आहेत. या सुरक्षा रक्षकांना पोलीस काठी, शिटी, टीशर्ट व ओळखपत्र देण्यात आले आहे. मांडवी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रफुल्ल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली नेमण्यात आलेल्या १०० सुरक्षा रक्षकांना सूचना व सुरक्षा रक्षकांनी काय करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, मांडवी पोलीस व गावांतील पोलीस पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रांम सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली

➢वृत्त...६




# महापालिका सरळसेवा भरती! कंत्राटी कर्मचाऱ्यांचा चेंडू राज्य शासनाच्या कोर्टात

**वसई,(प्रतिनिधी) :** वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाकडून घेण्यात येणार्या सरळसेवा भरतीप्रक्रियेत सामावून घेण्यात यावे याकरिता अनकि स्तर, पक्षीय संघटना यांच्याकडून राज्य शासनाला निवेदने सादर होत आहेत. पालिकेच्या विविध आस्थापनांवर मागील अनेक वर्षांपासून काम करणार्या कंत्राटी कर्मचार्यांना पालिकेच्या कामाची चांगली जाण आहे. त्यामुळे त्यांच्या व्यतिरीक्त अन्य बाहेरील उमेदवारांना संधी दिल्यास पालिकेच्या कामकाजात संथपणा येऊ शकतो. अशा पार्श्वभूमीवर राज्य शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिकेत कंत्राटी कर्मचार्यांना संधी द्यावी, असे आवाहन राज्य शासनाला करण्यात आले आहे. सध्या तरी महापालिकेतील कंत्राटी कर्मचार्यांचा चेंडू राज्य शासनाच्या

➢वृत्त...६

CamScanner

'बगावत से शिवसेना और महाराष्ट्र दोनों की छवि हुई धूमिल' पेज-3

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, शनिवार 28 जनवरी 2023

ग्लैमरस एक्ट्रेस मरीशा वर्मा की फिल्म जगत में धमाकेदार दस्तक पेज-6


| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, | 07.14 am / 06.29 pm | | अधिकतम 30°C न्यूनतम 22°C | NSE / BSE | |

# हाई सिक्योरिटी नंबर प्लेट नहीं तो हजारों का जुमार्ना

## ट्रैफिक नियम, चोरी और अपराध पर लगेगा लगाम




MHT संवाददाता

राकेश सिंह

नालासोपारा। केंद्र सरकार ने 1 जनवरी से सभी वाहनों के लिए हाई सिक्योरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट अनिवार्य कर दिए हैं। इसलिए अब हर राज्य में सभी वाहनों में हाई सिक्योरिटी नंबर प्लेट लगाना अनिवार्य है। चाहे आपके पास दोपहिया वाहन हो या चार पहिया, आपको हाई सिक्योरिटी नंबर प्लेट लगाना ही होगा। सरकार की नई गाइडलाइन के बाद अब वाहनों में हाई सिक्योरिटी रजिस्ट्रेशन प्लेट और कलर स्टिकर लगाना अनिवार्य हो गया है। ट्रैफिक नियमों का पालन करें अगर आप ऐसा नहीं करते हैं तो आपको भारी भरकम जुमार्ना देना पड़ सकता है या आपकी गाड़ी तक सीज हो सकती है।

## क्या होता है हाई सिक्योरिटी नंबर प्लेट

वाहन चोरी, वाहन दुर्घटना और अपराधों को सुलझाने में आ रही दिक्कतों को खत्म करने के लिए 'हाई सिक्योरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' अहम होगी। इन नंबर प्लेट्स पर हाई टेक्नोलॉजी का इस्तेमाल करते हुए बारकोड, 'इलेक्ट्रॉनिक चिप' और 'सेंसर' लगाया जाता है। इसमें वाहन मालिकों की पूरी जानकारी होती है। अगर इसका गलत इस्तेमाल हो रहा है, तो बारकोड और सेंसर इसे तुरंत पहचानने में मदद करते हैं। यदि चोर वाहन की लाइसेंस प्लेट को हटाने या बदलने का प्रयास करता है, तो संबंधित वाहन मालिकों के मोबाइल पर भी ऐसा संदेश प्राप्त हो सकता है।

## आकिर क्यों लिया गया यह निर्णय

ट्रैफिक अपराध या अन्य प्रकार के अपराध करने के बाद पुलिस से बचने के लिए वाहन नंबर प्लेट को बदल दिया जाता है। नंबर प्लेट बदलने के कारण कई बार वाहन का पता नहीं चल पाता है और अपराधियों को पकड़ना संभव नहीं होता है। इन अपराधों को दूर करने के लिए वाहन दुर्घटना के बाद वाहन मालिक की पूरी जानकारी उपलब्ध कराने की समस्या के समाधान के लिए वाहनों में हाई सिक्योरिटी नंबर प्लेट लगाना अनिवार्य कर दिया गया है। केंद्रीय सड़क परिवहन मंत्रालय ने 1 अप्रैल, 2019 से निर्मित नए वाहनों के लिए नए प्रकार की प्लेट अनिवार्य कर दी है।

## कितनी है नंबर प्लेट की कीमत ?

नंबर प्लेट में ऊपरी बाएं कोने में नीले रंग में हॉटस्टार अशोक चक्र का क्रोमियम आधारित 20 मिमी x 20 मिमी होलोग्राम है। जबकि दोपहिया वाहनों के लिए हाई सिक्योरिटी नंबर प्लेट की कीमत करीब 400 रुपये से शुरू होती है, लेकिन श्रेणी के आधार पर चौपहिया वाहनों के लिए यह 1100 रुपये तक होता है। रंग पहेली स्टिकर प्राप्त करने के लिए मालिक को 100 रुपये का भुगतान करना पड़ता है।

> वसई हाई सिक्योरिटी नंबर प्लेट के आदेश पर कारवाई शुरू हो चुकी है। डीलर्स द्वारा नई कारों को खरीदते समय इन नंबर प्लेट्स को लगाने के बाद ही रजिस्ट्रेशन किया जाता है।
>
> **प्रवीण बागडे**
> (सहायक अधिकारी, विरार-आरटीवो)

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-224 मुंबई, शनिवार 28 जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# क्राइम डिटेक्शन टीम के हत्थे चढ़े 3 शातिर चोर

**वसई :** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत तुलिंज थाना की क्राइम डिटेक्शन टीम ने घरफोडी चोरी के मामले में 3 आरोपियों को गिरफ्तार को गिरफ्तार किया गया है। इनके



पास से 5 लाख से ज्यादा माल जब्त कर 2 अपराधों की गुत्थी सुलझाई है। यह सफलता परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पीआई शैलेंद्र नगरकर के नेतृत्व में एपीआई मिथुन म्हात्रे की टीम ने पाई है। पुलिस ने बताया कि तुलिंज थाने क्षेत्र में सूचनाओं के आधार पर आरोपी देवेंद्र गणेश शेट्टी व शेखर नटराज नायर को हिरासत में लिया। इनके पास से 11 तोले वजन सोने के आभूषण, 20 तोला चांदी का कमरबंद, एलजी कंपनी की कलर टीवी कुलमिलाकर 3,88,000 रुपये का माल जप्त किया है, ठाणे शहर आयुक्तालय क्षेत्राधिकार में उपरोक्त नामित अभियुक्तों के खिलाफ कुल 6 मामले, मुंबई शहर आयुक्तालय क्षेत्राधिकार में 4 मामले और इस क्षेत्र आयुक्तालय क्षेत्राधिकार में 01 मामले दर्ज किए गए हैं, 16 जनवरी को तुलिंज थाने में चोरी का मामला दर्ज था, इस मामले में पुलिस ने आरोपी प्रशांत रत्नेश सिंह को गिरफ्तार कर उसके पास कुल 1,55,000 रुपये का माल जब्त कर व दो अपराधो की गुत्थी सुलझाई है।

Readers are recommended to make appropriate enquiries before sending money, incurring any expenses or entering into any

CamScanner

सामना

# तोतया पोलीस

भाईंदर : ४० हजारांची खंडणी उकळणाऱ्या तोतया पोलिसांना नवघर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. सुदर्शन खंदारे आणि जितेंद्र पटेल अशी अटक आरोपींची नावे आहेत. दीपक हॉस्पिटल परिसरातील श्री राज एन्क्लेव या इमारतीमधील एका घरात वेश्याव्यवसाय चालवत असल्याचे सांगत आरोपींनी ४० हजारांची खंडणी उकळली. याची तक्रार दाखल होताच पोलिसांनी दुकलीच्या मुसक्या आवळल्या.

Mumbai Edition
Jan 28, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

CS CamScanner

# वसई, भाईंदरमध्ये ३६ हत्या

## २०२२ मधील सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

**वसई :** २०२२ हे वर्ष वसई आणि भाईंदरमधील अनेक खळबळजनक हत्यांनी गाजले. शहरात २०२२ या वर्षात ३६ हत्यांचे गुन्हे दाखल झाले आहेत. २०२१ च्या तुलनेत हत्यांच्या प्रकरणात घट झाली असून, या सर्व गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

वसई आणि भाईंदर शहरात २०२१ मध्ये ४२ हत्यांचे गुन्हे नोंदविण्यात आले होते. तर, २०२२ मध्ये त्यात सहाने घट झाली असून, ३६ हत्यांची नोंद झाली. त्यात वसईतील लॉजमध्ये दोन वेगवेगळ्या घटनेत प्रियकराकडून प्रेयसीची हत्या, काशिमीरा येथे चिमुकल्याचे अपहरण करून हत्या, विरारमधील व्यापाऱ्याची हत्या आदी गाजलेल्या हत्यांचा समावेश आहे. वसईत राहणाऱ्या श्रद्धा वालकरची दिल्लीत हत्या, अंधेरीतील शाळकरी विद्यार्थिनीची हत्या करून नायगाव येथे फेकून दिलेल्या मृतदेहाचे प्रकरणही गाजले होते.

२०२० ते २०२२ या तीन वर्षात वसई, विरार आणि मीरा-भाईंदर शहरात एकूण ९६ हत्या झाल्या होत्या. २०२२ मधील सर्वच्या सर्व ३६ हत्यांच्या गुन्ह्यांची उकल करण्यात यश आलेले असले तरी मागील दोन वर्षांतील पाच हत्यांची उकल अद्याप झालेली नाही. त्या गुन्ह्यांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### २०२२ या वर्षातील प्रमुख हत्या

**४ फेब्रुवारी २०२२**
भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा येथे सावत्र पित्याने दोन वर्षांच्या चिमुकलीची हत्या केली. आदील खान असे या आरोपीचे नाव आहे. मुलगी सतत रडत असल्याने त्याने ही हत्या केली होती.

**१ मार्च २०२२**
वसईच्या पापडी येथील स्टेट्स लॉजमध्ये सायली शाहसने (२६) हिची तिचा प्रियकर सागर नाईक (२८) याने गळा दाबून हत्या केली. त्यानंतर बिहार येथील एका हॉटेलमध्ये जाऊन त्याने गळफास घेऊन स्वतःला संपवले.

**१४ एप्रिल २०२२**
नालासोपारा पश्चिमेच्या कळंब लॉजमध्ये अभिषेक शहा याने त्याच्या अल्पवयीन मुलीची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर चर्चगेट-विरार लोकलखाली उडी मारून आत्महत्या केली होती.

**३० मे २०२२**
वसईच्या 'एव्हरशाइन' येथे राहणाऱ्या ब्रायन राको आणि त्याची पत्नी पूनम ब्राको यांनी मीरा रोड येथील एका हॉटेलमध्ये सात वर्षांच्या मुलीची हत्या करून आत्महत्येचा प्रयत्न केला. कर्जबाजारी झाल्याने त्यांनी हे पाऊल उचलले. या घटनेत दाम्पत्य बचावले असून, त्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

**२८ जून २०२२**
खेळण्याच्या वादात मोबाइल तुटल्याने झालेल्या वादात संजय शर्मा (२४) या तरुणाला जीव गमवावा लागला. याप्रकरणी वालीव पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांसह तिघांना अटक केली. वसई पूर्वेच्या कामण येथे ही घटना घडली.

**३१ जुलै २०२२**
काशिमिरा येथे राहणाऱ्या मयांक ठाकूर या मुलाची त्याच्या दोन मित्रांनी ३५ लाख रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून हत्या केली. याप्रकरणी काशिमिरा पोलिसांनी अफजल अन्सारी (२२) आणि इम्रान शेख (२२) यांना अटक केली. या दोघांनी मयांकला फिरायला नेण्याच्या बहाण्याने बोलावले आणि त्याला वसईत नेऊन हत्या केली.

**३ सप्टेंबर २०२२**
विरारच्या नारिंगी येथील व्यापारी धर्मेंद्र वाघेला यांची आर्थिक वादातून हत्या करण्यात आली. पोलिसांनी जयेश पांचाळ या त्याच्या मित्राला अटक केली. वाघेला यांची हत्या केल्यानंतर त्यांचा मृतदेह एका लाकडी कपाटात टाकून ते कपाट एका टेम्पोतून नेऊन विरारच्या 'ग्लोबल सिटी' येथील नाल्यात फेकले होते.

**१८ नोव्हेंबर २०२२**
नालासोपारा पूर्वेच्या संतोष भुवन येथे राहणाऱ्या राजेश विश्वकर्मा (३२) याने त्याची पत्नी संजू सरोज हिची हत्या केली. तो उत्तर प्रदेश येथे पळून जात असताना पोलिसांनी रेल्वेत अटक केली.



### तीन वर्षातील हत्येचे गुन्हे

| वर्ष | २०२० | २०२१ | २०२२ |
|---|---|---|---|
| हत्या | २० | ४२ | ३६ |
| गुन्ह्यांची उकल | १९ | ३८ | ३६ |



CS CamScanner